आलेख

बहुजनवाद, समाजवाद व पुढील दिशा....

डॉ. यशवंत सुमंत

मंडल आयोगाने निर्माण केलेल्या राजकीय जागृतीमुळे भारतीय राजकारणात बहुजनवादाची पुन्हा एकवार चर्चा सुरू झाली आहे. भारतीय राजकारणातील मुख्य विरोध म्हणजे महाजन विरुध्द बहुजन असा आहे हे मानून शूद्रातिशूद्र जाती व एकूण दलित वर्ग म्हणजे बहुजन असा आहे हे मानून उच्चजातीय व उच्चवर्गीय आहेत ते महाजन अशी ढोबळ मांडणी केली जात आहे. भारतीय समाजात जर आता संघर्षवादी राजकारण उभे करावयाचे असेल तर महाजन विरुध्द बहुजन असेच ते करावे लागेल असाही सूर या मांडणीत ध्वनित आहे. बहुजन समाज पार्टी, बहुजन महासंघ, इ.ना येत असलेल्या यशांमुळे महाजन विरुध्द बहुजन हा फॉर्म्युला अगदीच अप्रस्तुत नाही हे वाटण्याइतपत उमेद शूद्रातिशूद्रांच्या वतीने संघर्षवादी राजकारण करू इच्छिणाऱ्या व्यक्ती, संघटना व पक्ष यांच्यांत निर्माण झाली आहे.

पूर्व युरोप आणि साम्यवादी जगाची पीछेहाट, सोविएत युनियनचे विघटन, आधुनिकीकरणाच्या अपरिहार्यतेमुळे चीनला अमेरिका व इतर भांडवलशाही देशांबरोबर करावी लागणारी तडजोड, वैश्विक भांडवलशाहीचा वाढता विळखा व क्षीण होत चाललेल्या डाव्या चळवळी हे सर्व पाहून आता



'समाजवाद' हा शब्द उच्चारायची सोय राहिली नाही असे काहींना वाटते, तर काहींच्या मनात समाजवाद हा कालबाह्य तर झाला नाही ना, अशा प्रामाणिक शंकाही येत आहेत. बहुजनवादी आणि समाजवादी अटीतटीची भूमिका घेत असल्यामुळे बहुजनवाद व समाजवाद या जणू काही परस्पर छेदक संकल्पना आहेत असे चित्र सामान्य लोकांपुढे उभे राहात आहे. इतकेच नव्हे तर बहुजनवादी वा समाजवादी अशी कोणतीच विचारधारा काटेकोरपणे न स्वीकारणारा पण सामाजिक न्यायाची बूज राखणारा जो सर्वसामान्य माणूस आहे, त्याची न्यायबुध्दीच दुभंगल्यासारखी झाली आहे.इकडे जावे की तिकडे या विचारामुळे तो कुठेच न जाणे पसंत करतो. न्यायबुध्दीचे हे दुभंगलेपण मग सामान्यजनांच्या संघटित शक्तीच्या दुभंगलेपणासही कारणीभूत ठरते. अशा परिस्थितीत परिवर्तनास अवश्य ठरणाऱ्या बऱ्याच बाबी व सर्वसामान्यांची त्याविषयीची सदिच्छा असूनही प्रत्यक्षात परिवर्तनवादी प्रक्रियेस अपेक्षित गती येत नाही. बहुजनवाद आणि समाजवाद याबाबत हेतुतः वा अनवधानाने केला जाणारा बुध्दिभेद परिणामतः परिवर्तनवाद्यांच्या शक्ती संचयास बाधक ठरतो. हे व्हावयाचे नसेल तर बहुजनवाद आणि समाजवाद या दोन संकल्पना व त्या अनुषंगाने व्यक्त होणाऱ्या विचारधारा याबाबत अधिकात अधिक स्पष्टता येण्याची गरज आहे.

बहुजनसमाज : संकल्पना व आशय

बहुजनवाद हे अद्यापी समाजवादी दर्शनाप्रमाणे परिपूर्ण असे दर्शन झालेले नाही. इतकेच नव्हे तर या शब्दाला नेमका अर्थ व आशयही प्राप्त झालेला नाही. त्यामुळेच राजकारणामध्ये या शब्दाचा/संकल्पनेचा आपापल्या सोयीने सर्व पक्षीय वापर सहज होऊ शकतो हे सर्व गृहीत धरूनही असे म्हणता येईल की भारतीय समाजवास्तवाच्या संदर्भात या शब्दाने काही एक सामाजिक न्यायाचा संदेश वेगवेगळ्या काळी भारतीय जनतेस पोहोचविलेला आहे आणि त्यामुळेच त्या शब्दाला जनमानसात एक अधिमान्यताही मिळाली आहे. बहुजनवाद या शब्दातून ध्वनित होणारा सामाजिक न्यायाचा विचार व संकल्प जोपर्यंत तात्त्विक पातळीवर, एतद्देशीय इतिहास परंपरेचा संदर्भात सुसंघटितपणे मांडला जाणार नाही तोपर्यंत बहुजनवादी विचारधाराही सिध्द होऊ शकत नाही. बहुजनवाद या शब्दाचा अर्थ अधिकाधिक स्पष्ट करणे म्हणजे बहुजनवादी विचारधारा सिध्द करणे होय. तशी ती पूर्णत्वाद जेव्हा सिध्द होईल तेव्हा समाजवाद व बहुजनवाद या शब्दाचा परिवर्तनलक्ष्यी आशय स्पष्ट करण्यास हरकत नसावी.

भारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या राजकारणास बहुजनवाद हा शब्द नवा नाही. पण या शब्दाचा केवळ तोच अर्थ घेणे म्हणजे भारताच्या ऐतिहासिक परंपरेमध्ये या शब्दाशी सामान्य जनसमूहांच्या ज्या न्यायलक्ष्यी अस्मिता निगडित झाल्या आहेत, त्याचा विपर्यास करणे होय. असा विपर्यास अनेक वेळा भारतीय इतिहासात झाला आहे आणि म्हणूनच त्यात समता व सामाजिक न्यायाचा खोल अर्थ गर्भित असूनही त्याचे सुसंघटित तत्त्वज्ञान होऊ शकले नाही.

बहुजनशक्तीचे जातनिहाय व वर्गनिहाय स्वरूप हे भारतातील भिन्न प्रांतांत भिन्न भिन्न असणे स्वाभाविक आहे. तपशीलातील बारकावे सोडल्यास स्थूल मानाने मंडलोत्तर बहुजनवाद हा प्रायः शूद्र अस्मितेशी निगडित झाला आहे. विचारधारेच्या पातळीवरच हा बहुजनवाद कोणती ध्येये व उद्दिष्टे सांगतो ते आता संक्षेपाने पाहू.

बहुजनवादाचे वेगळेपण कशात?

ब्राह्मण्यवादास व ब्राह्मणी वर्चस्वास विरोध हे या बहुजनवादाचे पहिले ठळक वैशिष्ट्य आपल्याला दिसून येईल. ब्राह्मण्यवाद ही एक वर्चस्ववादी तत्त्वप्रणाली असल्याने ब्राह्मण तर सोडाच, पण ब्राह्मणेतर जातीही या ब्राह्मण्यवादाची कास कास धरून, कळत नकळत शूद्रातिशूद्र जातींचे शोषण करतात. म्हणून या ब्राह्मण्यग्रस्तांच्या विरोधात हा बहुजनवाद आपला आवाज उठवताना दिसतो.

दुसरी गोष्ट म्हणजे या बहुजनवादाची तात्त्विक प्रेरणा फुले-आंबेडकर यांचा विचार ही आहे. या दृष्टीने पाहता फुले-आंबेडकर विचाराला अखिल भारतीय पातळीवर नेण्याचे ऐतिहासिक काम बहुजनवादाने केले हे निर्विवाद. एरवी एक प्रचंड विश्वात्मक दृष्टी असलेले हे विचारवंत येथील जातिबध्द समाज वास्तवात त्यांच्या त्यांच्या जातीचेच वा जाती-पुंजाचेच नेते म्हणून राहिले असते! बहुजनवादाने निष्ठांच्या पातळीवर फुले-आंबेडकर स्वीकारून त्याला भारतीयांच्या मुक्तीचे हत्यार बनवले हेही नाकारून चालणार नाही.

तिसरी गोष्ट म्हणजे भारतासारख्या जातिग्रस्त समाजात शोषित जातींचे शोषक जातीच्या विरोधात ध्रुवीकरण होऊ शकत नाही हे आंबेडकरांच्या प्रत्ययास आले होते. आंबेडकरांनी त्यांच्या लेखनातून हा मुद्दा सातत्याने मांडलाही आहे. म्हणूनच 'शूद्रातिशूद्र'च्या फुले प्रणित सूत्राचा विस्तार करून आंबेडकर त्रैवर्णिकांच्या विरोधात शूद्रातिशूद्र, आदिवासी व गुन्हेगार ठरलेल्या जमाती अशा एकूण शोषित समाजघटकांच्या राजकीय शक्ती संघटनेची शक्यता भौतिक शोषणाच्या संदर्भात सूचित करतात.

Scanned by CamScanner

असे शक्ती-संघटन वर्णभान आणि जातिभानाच्या अस्तित्वामुळे गुंतागुंतीचे आहे याची आंबेडकरांना जाणीव होती. इतकेच नव्हे तर तो त्यांचा अनुभवही होता. तरीही भौतिक शोषणाच्या संदर्भात हे सर्व समाजघटक परस्परांचे स्वाभाविक मित्र असू शकतात ही संभाव्यता त्यांनी ध्वनित केली होती. फुले विचारातही ही अभिप्रेत आहे. या शक्यतेला आजच्या बहुजनवादाने आपल्या विचारधारेचा एक आधार मानले आहे. यातूनच शूद्र व दलित जाती या एका राजकीय प्रक्रियेच्या संदर्भात एकत्र येताना दिसतात. उत्तरेतील मुलायमसिंग-काशीरामांचा प्रयोग व महाराष्ट्रातील प्रकाश आंबेडकर-सखाराम पवार व शांताराम पंदेरे यांच्या बहुजन महासंघाची वाटचाल यातून शूद्रातिशूद्रांची व तत्सम शोषितांची एक व्यापक आघाडी जी राजकीय शक्तीच्या स्वरूपात व्यक्त होत आहे त्यावरून हे स्पष्ट होईल. याच शूद्रभानाची जाण ठेवून महाराष्ट्रातील मुस्लिम समाजही आता मुस्लीम ओ.बी.सी. संघटनेच्या माध्यमातून जागृत व संघटित होत आहे व जमातवादी राजकारणाच्या चौकटीतून बाहेर पडत आहे याची नोंद अगत्याने घ्यायला हवी.

चौथी महत्त्वाची बाब म्हणजे मंडलोत्तर बहुजनवादाने फुले-आंबेडकरवादी परंपरेचा धागा पकडून शूद्रातिशूद्रांच्या समवेत प्रथमच येथील शूद्रमुस्लिमांना परिवर्तनाच्या व्यापक लढ्यात आपल्या बरोबरीने सामील करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. व त्यामुळे मुस्लिम समाजातील जातिवादालाही एक प्रकारे वाचा फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या समाजातील कनिष्ट जातींचे शोषणही आता बोलके होत जाईल व मुस्लिमेतर मूकनायकांच्या जाणिवेशी तादाम्य पावतील. भारतातील जातिव्यथा ही केवळ हिंदू समाजाचीच नसून हिंदूसमाजाच्या सहवासात आलेल्या हिंदेतर अशा मुस्लिम, ख्रिस्ती, शीख समाजाचीही ती व्यथा आहे, हेच यातून सूचित होते. इतके दिवस जातीय प्रश्नांचा विचार जो हिंदू कम्युनिटीच्याच संदर्भात झाला तो आता हिंदेतर भारतीय समाजाच्या बाबतीतही सुरू झाला आहे. आपल्या समाजातील जातिव्यवस्था हा एक अखिल भारतीय 'फेनॉमिनन' आहे हे या बहुजनवादाने स्पष्ट करण्यात व शूद्रातिशूद्र व मुस्लिम यांच्या संयुक्त शक्तीची बांधणी करण्यात प्रथमच आघाडी मारली आहे. फुले-आंबेडकरवाद ही एक वर्धिष्णु विचारधारा आहे, हेच यातून स्पष्ट होते. हिंदु-मुस्लिम संबंधांचा व प्रश्नांचा विचार निव्वळ जमातवादाच्याच संदर्भात करण्याचा वसाहतवादी वारसा जो आपण आजवर या ना त्या स्वरूपात चालवला त्याला मंडलोत्तर बहुजनवादाने जातिप्रश्नाचे परिमाण देऊन त्याकडे पहाण्याची एक वेगळी दिशा दाखवली. हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही धार्मिक जमातवादांवर यामुळे मात करता येणे शक्य होईल असे वाटते.

मंडलोत्तर बहुजनवादाच्या या विधायक उद्दिष्टांचे स्वागत होणे गरजेचे आहे. ही सर्व उद्दिष्टे पूर्णांशाने साध्य झाली आहेत असे कोणीच म्हणणार नाही. त्यात अडचणी आहेत. त्या निर्माणही केल्या जातील, पुढा आहे; हे सारे मान्य करूनही या बहुजनवादाने जी दिशा सूचित केली ती भारतीय समाजातील समग्र परिवर्तनास पुढे नेणारी आहे हे मान्य करायलाच हवे. हे न करता कोणाच्याही लक्षात येणाऱ्या त्यातल्या विरोधाभासावरच लक्ष केंद्रित करून, ही उद्दिष्टे, वास्तवाकडे शास्त्रीय दृष्टीने पाहता, कशी अप्राप्य आहेत हे सांगणे म्हणजे ब्राह्मणी बुध्दिभेद करण्याचाच प्रकार आहे. याचा अर्थ बहुजनवादातील विसंगती कोणी कधी दाखवूच नयेत असे नव्हे. पण त्या तारतम्यानेच दाखवाव्या लागतील याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

वैधिक मूल्यांचे दर्शन

आजच्या बहुजनवादास वैचारिक शक्ती व स्फुरण देणारी एक प्रदीर्घ अवैदिक-अब्राह्मणी विचार परंपरा जी भारतात दिसून येते त्या परंपरेने कोणत्या मूल्यांचा पुरस्कार केला? या प्रश्नाला भिडले म्हणजे बहुजनवादी विचारमालेत अनुस्यूत असलेल्या वैधिक मूल्यांचे दर्शन होते. ही मूल्ये कोणती? 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता!' म्हणजे पुन्हा आधुनिक पश्चिमी मूल्येच की काय? नव्हे, कदापि नव्हे. केवळ नाम सादृश्यामुळे तसे वाटेलही. पण या मूल्यांचा अर्थ, आशय, संदर्भ आणि पोत वेगळा आहे. याच अर्थाने आंबेडकरांनी स्पष्टपणे म्हटले की, 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्ये मी फ्रेंच राज्यक्रांतीपासून शिकलो आहे असे कोणी समजतात ते चूक होय. ही मूल्ये मी, माझा गुरू बुध्द, त्याच्यापासून शिकलो आहे.' आंबेडकरांचे हे विधान पुरत्या गांभीर्याने घेतले तर अब्राह्मणी विचारपरंपरेतून येणारी मूल्ये वा आधुनिक पश्चिमी संस्कृतीतून येणारी ही मूल्ये यातील गुणात्मक फरक लक्षात येईल.

स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही मूल्यांपेक्षा आंबेडकरांनी अधिक प्राधान्य दिले आहे ते बंधुत्वास. बहुजनवादी विचारधारेचे म्हणून ते एक वैशिष्ट्य ठरू शकेल. किंबहुना तो गाभाही मानावा लागेल. आंबेडकर म्हणतात, 'अपरिमित स्वतंत्रतेने समतेचा नाश होतो व निर्भेळ समानता स्वातंत्र्याला वाव ठेवीत नाही. माझ्या तत्त्वज्ञानात बंधुतेला फार उच्च स्थान आहे.' बहुजनवाद विध्यात्मक पातळीवर काही देणारच असेल तर ती ही 'बंधुता' होय, अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही.

एकोणिसाव्या शतकातील प्रार्थनासमाज, ब्राम्होसमाज, सत्यशोधक समाजापासून ते आंबेडकरांच्या धम्म विचारापर्यंत महाराष्ट्रात जे नवे धर्मचिंतन झाले त्याची एक प्रेरणा पश्चिमी उदारमतवादाची जशी होती तशी दुसरी एतद्देशीय अवैदिक परंपरेतील तत्त्वचिंतनाचीही होती हे विसरून चालणार नाही. कित्येक वेळा हा अवैदिक विचार वैदिक परिभाषेतही व्यक्त झालेला आहे. गीतेकडे या अंगाने पाहिले जात नाही. उलट श्रेष्ठ प्रतीचा समन्वयात्मक हिंदू ग्रंथ म्हणून त्याची भलावण वैदिक परंपराभिमान्यांकडून केली जाते. अवैदिकांच्या अशा अनेक संस्था, विचार वैदिकांनी आपले म्हणून बळकावले व तथाकथित वर्धिष्णु, सहिष्णु, हिंदू धर्माची भलावण केली.

जे खणखणीत अवैदिक होते ते वैदिक वाटमाऱ्यांनी बळकावले म्हणून ते बहुजनवादास कायमचे वर्ज्य होण्याचे कारण नाही. उलट ही वाटमारी उघडकीस आणून आपला वारसा स्पष्ट करणे, तो लोकांपुढे आग्रहाने सांगणे गरजेचे आहे आणि बहुजनवादाची मांडणी या अंगानेच होऊ शकेल. तात्पर्य काय तर 'स्वातंत्र्या'ला केवळ मूल्य मानून मानवी इतिहासाने उदारमतवादी क्रांती केली. 'समते'ला केवळ मूल्य मानून समाजवादी क्रांत्या झाल्या. 'बंधुत्वा'ला केंद्रस्थानी ठेवून बहुजनवादी क्रांती झाली तर बहुजनवादाची ती विश्वाला सर्वात मोठी देणगी असेल. पण त्यासाठी फार मोठी विचारांची झेप व दृष्टी बहुजनवादास दाखवावी लागेल. ती झेप सिध्द करण्यासाठी आवश्यक असलेली प्रदीर्घ वैचारिक परंपरा मात्र नुसती स्वीकारावी लागेल असे नव्हे तर पेलावी लागेल. अब्राह्मणी परंपरा सांगताना कांशीराम फुल्यांच्या मागे (म्हणजे फुलेपूर्व-काळात) जाऊ इच्छित नाहीत हे या संदर्भात खटकणारे आहे. फुलेपूर्व काळातील सर्वच चिंतन 'ब्राह्मणी', म्हणून त्याची वासलात लावता येणार नाही हे जाणूनच फुले आणि आंबेडकर आपापल्या परीने भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन परंपरांना भिडले. बहुजनवादी विचारवंतांना हे आव्हान पेलावे लागेल. शोषित व दुर्बल समाज घटकांच्या हितसंबंधांना राजकारणाच्या जीवघेण्या स्पर्धेत अग्रक्रम देतानाच शोषक वर्गाच्या न्यायबुध्दीलाही आवाहन करावे लागेल. त्यांच्यातील ज्यांची न्यायबुध्दी जागी होईल त्यांना आत्मविश्वासाने आपले म्हणावे लागेल. ते कधीच बदलणार नाहीत हे म्हणणे नुसते अनैतिहासिक नव्हे तर मानवी जीवनातील मांगल्यावर अविश्वास दाखविण्यासारखे आहे. आणि मांगल्यावरील विश्वासाशिवाय कोणतेही समाजपरिवर्तन चिरायु होत नाही! या दृष्टीने गांधीविचाराकडे बहुजनवादास गंभीरपणे पाहावे लागेल. कारण क्रोधाला अक्रोधाने, शठाला सत्याने, वैराला प्रेमाने जिंकावे असे सांगणारा बुध्दविचार गांधी राजकारणात आणू इच्छित होते. ते मग दलितांचे, बहुजनवादाचे शत्रू कसे? 'मूनवादी', 'वैदिक' कसे? तुम्ही आमच्याएवढे कडवे, जहाल नसाल तर तुम्ही आमचे शत्रूच ही शीतयुध्दकालीन मानसिकता सोडून द्यावी लागेल. बंधुत्वाचे मूल्य जर आपली जाणीव व्यापून राहील तर हे शक्य आहे. पण हे सातत्याने सांगणारी विचारवंतांची, बुध्दिजीवी वर्गाची फौजच्या फौज उभी करावी लागेल. बहुजनवादापुढे खरा प्रश्न आहे तो ही फौज कशी उभी करावयाची याचा. पण एकदा जर

Scanned by CamScanner

आपल्या मूल्यात्मक धारणा स्पष्ट झाल्या तर कामाची वाटचाल अचूक रस्त्यावर सुरू होते. तात्पर्य आपल्या मूल्यात्मक धारणांसाठी व नैतिक ध्येयासाठी बहुजनवादास कोणत्याही अभारतीय विचारधारेकडून उसनवारी करायची गरज नाही.

मर्यादा आणि धोके

बहुजनवाद्यांकडून असा दावा कधी कधी केला जातो की जर बहुजन ही शूद्रातिशूद्र व्यापक आयडेंटिटी बनत असेल तर मग वेगळ्या दलित आयडेंटिटीची गरजच काय? किंबहुना अशी आयडेंटिटी कायम ठेवणे हा शक्तिक्षयच नव्हे काय? बहुजन आयडेंटिटीमध्ये दलित आयडेंटिटी जरी अंतर्भूत होत असली तरी जिथे दलितांना या बहुजन आयडेंटिटीमध्ये आपले आत्मविसर्जन तर होणार नाही ना असे वाटत असेल तेथे त्यांना 'तुम्ही दलित आयडेंटिटी सोडा व बहुजन आयडेंटिटीच स्वीकारा'-असे म्हणणे त्यांच्यावर अन्यायाचे होईल. कारण बहुजनवाद जर शोषितातल्या शोषित घटकांच्या न्यायासाठी झगडत असेल तर तो सर्वाधिक शोषित घटकांच्याच भावनांची प्रथम कदर करील. अशा परिस्थितीत बहुजन आयडेंटिटीला दलित आयडेंटिटीमध्ये समर्पित करताना खरा तर संकोच वाटू नये. कारण हे समर्पण नव्हेच. ती तादात्मता आहे. ज्या उद्दिष्टांसाठी व ध्येयासाठी बहुजनवाद आज उभा राहू इच्छितो त्या ध्येयाशी झालेली ती एकरूपता आहे.बहुजनवाद्यांमधील दलितेवर जातीकडून विचार, उच्चार, आचार व संघर्षात्मक कृतीच्या पातळीवर यातादात्म्यतेची स्पष्ट ग्वाही दलितांना मिळेल तर हे द्वंद्व संपू शकेल. पण यात पहिले पाऊल दलितेवर बहुजनवाद्यांनीच उचलले पाहिजे हे निर्विवाद.

दुसरा एक मुद्दा म्हणजे बहुजनवादाने जरी हिंदुत्वविचार विरोधी (हिंदू समाज विरोधी नव्हे) भूमिका घेतली असली तरी सर्वच बहुजन वर्ग या बहुजनवादाचा स्वीकार करतो असे नाही. बहुजनवर्गातील अनेक घटक विचारांच्या व जाणिवेच्या पातळीवर बहुजनवादी झाले असे नाही. हितसंबंधात्मक राजकरणाच्या पातळीवर त्यांची एकी दिसते पण वैचारिक, मूल्यांच्या पातळीवर ते सर्व एकच आहेत असे नाही.

याचाच फायदा सत्ताधारी वर्ग आणि सत्ताधारी पक्ष दोघेच नेहमीच घेत असताता. परिणातः काँग्रेस, शिवसेना, भाजप हे सारेच आम्ही बहुजनवादी कसे आहोत हे दाखवित बहुजनवर्गाचा बुध्दिभेद करतात व बहुजनवर्गातील बरेच घटक त्याच बळी ठरतात. अशा परिस्थितीत बहुजनवदी निष्ठा मानणारे कोण व बहुजनवादी निष्ठा न मानणारे कोण यातील विवेक, जात, वर्ण, वर्ग व पक्षदूषित दृष्टी बाजूला ठेवून करावा लागेल. तसा तो विचार करताना बहुजनवादास कळत न कळत होणारा हिंदुत्व विचाराचा स्पर्श न स्पष्टपणे नाकारला पाहिजे. बहुजनवादी जाणीव आणि हिंदुत्व विचाराचा स्पर्श स्पष्टपणे नाकारला पाहिजे. बहुजनवादी जाणीव आणि हिंदुत्ववादी जाणीव यातील फरक सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट झाला पाहिजे. हिंदू माणूस जसा वर्णग्रस्त आहे तसा तो जातिग्रस्त आहे. त्याच्या वर्णांच्या जातीशी त्याचा संघर्ष असेल तर तो जातिभान जपतो आणि त्याच्या वर्णाबाहेरील जातीशी त्याचा संघर्ष असेल तर तो वर्णभान जपतो हे आंबेडकरांचे मार्मिक निरीक्षण या संदर्भात नजरेआड करून चालणार नाही. हे वर्णभान जपणे म्हणजे हिंदू जाणीव जपणे होय. बहुजनवादाने या वर्णजाणिवेचा स्पष्ट निषेध करणे आवश्यक आहे. निव्वळ हिंदुत्वविचाराचा निषेध हा पोकळ व म्हणून भोंगळही असू शकतो.

समाजवादाशी नाते

बहुजनाच्या ज्या मूल्यात्मक गाभ्याची वर आपण चर्चा केली तो गाभा व ध्येये समाजवादास अमान्य आहेत असे नाही. समाजपरिवर्तन करीत असताना शोषणमुक्त व समाजवाद या विचारधारांची सारखीच आहे. या दोन्ही विचारधारांना लाभलेली विशिष्ट भौतिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी भिन्न असल्यांमुळे त्यांची वैचारिक प्रेरणास्थाने, समाजरचनेच्या परिवर्तनातील त्यांचे अग्रक्रम व भोवतालच्या वास्तवाचे आकलन हे भिन्न असणे स्वाभाविक आहे. पण हे भिन्नत्व शत्रूभावी आहे की मित्रभावी आहे याचा कोठेतरी विवेक करावाच लागेल. तसा तो अधिकाधिक होत राहिला तर उभय विचार परस्परांमुळे समृध्द होत जातील हे निर्विवाद.

समाजवादी दर्शन समजावून घेताना एका गोष्टीचे नेहमी भान ठेवले पाहिजे व ते हे की ते एक वैश्विक दर्शन आहे. प्रबोधनोत्तर पश्चिमी आधुनिक संस्कृतकडून जगाला कोणत्या मौलिक जीवनाचा विचार दिला गेला? मानवाच्या व्यथा आणि वेदना सर्वत्र सारख्याच आहेत आणि त्यामुळेच अखिल मानवमुक्तीचा विचार एकत्रितपरे होऊ शकतो, त्या दिशेने प्रयत्नही करता येतात व ते एक प्राप्त करण्याजोगे ध्येय आहे हा विचार जगभरच्या मानवी समूहांना या आधुनिक पश्चिमी संस्कृतीने दिला. ही वैश्विकता विश्वात्मक होण्याची क्षमता असलेल्या बहुजनवादाने नजरेआड करून चालणार नाही. कारण या दोन विचारधारेतील अनुबंध या वैश्विकतेच्या संदर्भातच स्पष्ट होऊ शकता व झाला पाहिजे. तसा तो झाला नाही तर समाजवाद्यांच्या किंवा बहुजनवाद्यांच्या मनुष्यसुलभ चुका या स्वार्थगर्भ वाटू लागतील. परिणामतः सत्ताधारी वर्गाचे हुकमी एक्का असलेले 'काग्ग्यात - सिध्दांताचे' साधन त्यांच्या ऐवजी आपणच एकमेकांविरुध्द वापरत बसू. नव्हे तसे होतही आहे. हे टाळायचे असेल तर डाव्या परिवर्तनवादी चळवळीची भावशुध्दी होणे आवश्यक आहे. या भावशुध्दीसाठी फुले-आंबेडकर विचार व गांधी विचारापासून पुष्कळसे शिकण्यासारखे आहे. बहुजनवाद हे प्रश्न ऐरणीवर आणील, नव्हे त्याने ते आणलेच पाहिजे. कारण समाजवाद व बहुजनवाद या विचारधारेतील अनुबंध स्पष्ट होण्याची ती एक पूर्वशर्त आहे. समाजवादासही आपला प्रबोधनोत्तर बुध्दीवादाने व प्रत्यक्षवादाने एकारलेला अहंकार सोडून द्यावा लागेल व विनम्रपणे फुले-आंबेडकर-गांधी प्रणित बहुजनवादातील व्यक्तीसमष्टी परस्पर संबंधाचा विचार करावा लागेल. हा विचार उदारमतवादी लोकशाही चिंतनातील बहुमतवाद व लोकशाही केंद्रीकरणातील 'हायकमांडवाद' यांच्याही पुढे जाणारा मुद्दा आहे.

समाजवादाच्या बाबतीत दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एका संपन्न व आधुनिक ज्ञानपरंपरेचा लाभ झाल्याने समाजवादाने अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था चिकित्सेचे एक अत्यंत परिपूर्ण असे शास्त्र तयार केले आहे. प्रचलित अर्थव्यवस्था, उत्पादनसंबंध, त्याचा समाज घटकांच्या निर्मितीवर व एकूण संस्कृतीवर होणारा परिणाम या संबंधी समाजवाद खूप काही अधिकारवाणीने शास्त्रीय पध्दतीने बोलू शकतो. बहुजनवादास त्याचे हे बोलणे ध्यानपूर्वक श्रवण करावे लागेल. जाती-वर्ण अंताचा लढा अग्रक्रमाने हाती घेत असताना भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या विश्लेषणाची जी वैचारिक साधन सामग्री समाजवादाने तयार केली आहे ती जबाबदारीने वापरावी लागेल. भारतातील आजच्या 'ग्लोबलायझेशन', 'लिबरलायझेशन'च्या चढत्या कमानीमुळे समाजवादी अर्थव्यवस्था, समाजवादी अर्थनीती व परिणामतः समाजवादी अर्थविचार हा सत्ताधारी व त्याच्या कच्छपी असलेल्या बुद्धिजीवी वर्गात उपहासाचा विषय झाला आहे. भांडवलशाही अर्थविचारास कोणता पर्यायच असू शकत नाही हा विश्वास वाढत आहे. त्यामुळेच की काय खुली अर्थनीती, वैश्विक भांडवलशाही यासंबंधी बहुजनवाद फार काही बोलताना दिसत नाही. त्यासाठी पर्यायी विचार सुचलाच पाहिजे असे काही नाही. पर्याय न सुचताही जे चूक आहे ते चूकच म्हणण्यास हरकत नाही. हे ओळखून चालू आर्थिक मन्वंतरासंबंधीचे मौन बहुजनवादाने सोडवायला हवे. जनशक्तीच्या साहाय्याने जगभरच्या समजवाद्यांनी ठिकठिकाणी उभे केलेले वर्ग-वंश-धर्मनिरपेक्ष आर्थिक लढ्यांचे व त्यातील रणनीतींचे त्यातील चुकांसहित सुक्ष्म चिंतन बहुजनवाद करेल तर समाजवाद त्याच्या ध्येयप्राप्तींसाठी साहाय्यभूत ठरेल, हे निर्विवाद. बहुजनवाद व समाजवादाने परस्परांना साहाय्यभूत ठरणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी उभयतांना परस्परांप्रती विनम्र व्हावे लागेल. सत्यशोधनाच्या हेतू शिवाय अन्य कोणत्याही हेतूने परस्परांच्या मनुष्यसुलभ चुकांची चिकित्सा होणार नाही याची खबरदारी घ्यावी लागेल. राजकारणातील तात्कालिक यशापयशाचे भांडवल न करता निकोप मनाने परस्परांना स्वीकारावे लागेल. भाषेचा संयम पाळावा लागेल. 'जार्गन'चे ओझे दूर ठेवावे लागेल. प्रवर्तकपणाचे क्षुद्र दावे सोडावे लागतील. आपण जे काही आहोत ते एका व्यापक मानवी संचितामुळे आहोत हा विनय जोपासावा लागेल. यातूनच विविध विचारधारांना प्रतीत होणाऱ्या सत्यांशांचे व्यापक सत्याच्या विकासात रूपांतर होईल. बहुजनवादी विचारधारा व समाजवादी विचारधारेला परस्परांना पूरक होऊन या प्रक्रियेस हातभार लावता येईल. त्यांनी परस्परांना पूरक होणे ही काळाची गरज आहे. आणि त्यांच्या परस्परपूरकतेतून एका नव्या वैश्विक दर्शनाची निर्मिती होणे ही आधुनिकोत्तर जगाची गरज आहे याचे भान ठेवले तरी पुरे.

('आंदोलन'मधून साभार !)

◆◆◆

Scanned by CamScanner